मानवी इतिहासात एक काळ असा आला की, स्त्रीच्या योनिशुचीतेचे स्तोम, त्याचे महत्त्व इतके अवास्तव झाले की घराच्या प्रतिष्ठेशी त्याची नाळ जोडली गेली. चारित्र्य, इज्जत, कलंक या मापात ती तोलली जाऊ लागली आणि आजही समाजमनात बलात्काराची प्रतिष्ठापना त्याच पद्धतीची आहे. बलात्काराची घटना घडण्यास जो बलात्कार करतो तो नव्हे तर जिच्यावर बलात्कार होतो ती पिडीत, बळी स्त्री हिच जबाबदार आहे, असते अशी समाजाची धारणा आहे. त्यामुळे न्यायालयात दोषी, अपराधी, गुन्हेगार जरी पुरुष असला तरी समाज मात्र त्याची शिक्षा स्त्रीला देत आला आहे. उदाहरण पाहू, एका स्त्रीच्या घरात चोरी झाली. त्याची तक्रार नोंदविण्यासाठी ती पिडीत स्त्री पोलीस ठाण्यात गेली. पोलीस तिच्या बोलण्यावर विश्वास ठेवतात आणि लगेच तक्रार स्वीकारतात. तपास करतात. चोर पकडला जातो. कोर्टात केस चालते. चोराला शिक्षा होते. सगळ्यांचे लक्ष चोराकडे. दोष फक्त त्यालाच दिला जातो. गुन्हेगार केवळ चोरालाच मानले जाते. ज्या स्त्रीच्या घरात चोरी झाली, तिच्यावर कोणता दोष, कलंक लागतो का? तर असे होत नाही. मात्र चोरीऐवजी बलात्कार किंवा विनयभंगाची तक्रार असेल तर? त्याची तक्रार नोंदविण्यासाठी ती पिडीत स्त्री पोलीस ठाण्यात गेली तर पोलीस तिच्या बोलण्यावर विश्वास ठेवतात? लगेच तक्रार स्वीकारतात? उलट तिच्याकडे चमत्कारिक रीतीने पहिले जाते. अविश्वास असतो. तपासाअंती बलात्कार करणारा पकडला जातो. कोर्टात केस चालते. त्याला शिक्षा होते. सगळ्यांचे लक्ष फक्त त्याच्याकडे असते का? दोष फक्त त्यालाच दिला जातो का? याचे उत्तर 'नाही' असे मिळते. कारण या केसमध्ये सगळ्यांचे लक्ष तक्रारकर्तीवर जास्त असते. पिडीत स्त्रीला कलंकित ठरविले जाते. समाज तिला तिरस्करणीय, घृणित मानतो. तिचे लग्न होत नाही. ती आयुष्यातून उठते, उध्वस्त होते. पिडीतेला अशी शिक्षा का?

कलकत्त्यामध्ये घडलेली एक सत्य घटना सांगते, एक स्त्री एके रात्री एका हॉटेलमधून एकटी बाहेर पडते. एक कार तिथे येते आणि ती स्त्री गाडीतील तरुणाकडे लिफ्ट मागते. ती आत बसल्यानंतर तो तरुण आणखी दोन जणांना गाडीत घेतो. गाडीतच तिच्यावर सामुहिक बलात्कार केला जातो आणि तिला गाडीतून ढकलून सुनसान रस्त्यावर फेकून देऊन गाडी निघून जाते. अतिशय विचित्र अवस्थेत कशीबशी ती घरी पोहोचते. घरातील लोकांचा विरोध असतानाही दुसऱ्या दिवशी पोलीस ठाण्यात जाऊन ती तक्रार नोंदविते. पोलीस तपास करतात. चार जणांपैकी तीन जण पकडले जातात. मात्र लगेच जामिनावर सुटतात आणि एक जण फरार असतो. त्यामुळे आरोपी पुन्हा तिला किंवा तिच्या कुटुंबियांना त्रास देतील, हल्ला करतील या भीतीने ती स्त्री अत्यंत तणावग्रस्त जगत असते. डिसेंबर २०१६ मध्ये दिल्लीत निर्भया केस झाली तेव्हा तिने निर्भयाला न्याय मिळावा म्हणून झालेल्या आंदोलनात, निदर्शनात भाग घेतला आणि सर्वांसमक्ष येऊन उघडपणे तिची कथा, तिची व्यथा सांगितली तर तिलाच अनेक आरोपांना तोंड द्यावे

लागले. हिला रात्रीची घराबाहेर जायची, अनोळखी गाडीत अनोळख्या लोकांबरोबर बसायची गरजच काय होती? तिने कपडे कोणते घातले होते? यावरही अगदी प्रसारमाध्यमांमधून चर्चा, टीका झाली. 'हि स्त्री वाईट चालीची असणार' येथपर्यंत बोलले गेले. एवढेच नाही तर तिला कामावरून काढून टाकण्यात आले. समाजाने बलात्कार करणाऱ्याना नाही तर बलात्कार पिडीतेलाच कलंकित, भ्रष्ट ठरविले आणि तिलाच नीतीमत्तेचे धडे दिले. बलात्कारामुळे आयुष्य उध्वस्त झालेल्या, अमानुषपणे जीवे मारल्या गेलेल्या, बलात्कारानंतरच्या बदनामीच्या भीतीने जीव दिलेल्या स्त्रियांच्या अनंत करूण, हृदयद्रावक कहाण्या आहेत. कायद्यात बदल घडवून आणण्यास कारण ठरलेल्या बहुचर्चित घटना आपण अभ्यासणार आहोत पुढच्या काही भागांमध्ये.

ॲड. प्रज्ञा हेन्द्रे जोशी

अहमदनगर मो. ९८५००७५४४३